वर्ष २२
अंक ६ वा
१५ डिसेंबर १९४८

# समाजस्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे
एम्. ए.

किंमत
४
आणे

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १. | काम आणि नीति–२ ... ... ... | १२१ |
| २. | अेक करतां अेक ! ... ... ... ... | १२७ |
| ३. | ' अेक होता म्हातारा ' ... ... ... | १३४ |
| ४. | अहिंसकाची स्त्रीहिंसा ... ... ... | १३८ |
| ५. | पत्रव्यवहार ... ... ... ... | १३९ |
| ६. | शारदेचें पत्र ... ... ... ... | १४० |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें :** अेल्. के. जोशी, बुकसेलर
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**कोल्हापूर:** स्कूल अॅन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**बेळगांव:** जे. एम. माणूरकर, खडे बाजार.

**अहमदनगर:** पी जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**वर्धा :** डब्ल्यू. एल्. चावके, C/o एस. एच्. कुंभारे, न्यूज एजंट

**निपाणी :** के. एस् बळगुर्गी

**कुमठा :** आर्. एम्. कामत

**नागपूर** सी. पी. ताठे, नवयुग न्यूज अेजन्सी.

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर

**सावंतवाडी :** विनायक के. वाडकर.

**सोलापूर :** सौ. पार्वतीबाई म्र० महालिंग गुदगे, नं. ७२ उत्तर कसबा.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# काम आणि नीति-२

दुर्दैवाने फ्रॉइडने नीतीच्या बाबतींत मूलगामी विचार केलाच नाहीं आणि त्यानेंही इतर डाक्टरांप्रमाणेंच चालू क्लीबनीतीला अनुसरून नैसर्गिक प्रवृत्तींना विकृति म्हटलें. आणखी अेक आश्चर्य असें कीं अेका ग्रंथांत फ्रॉइडने कामवासनेला अितकें महत्त्व दिलें आहे की तिला त्यानें जीवनाचें सार म्हटलें आहे. कारण उघडच आहे. कामवासना ही जीवनाची, आरोग्याची, खूणच आहे. तरमग ज्यांची कामवासना तीव्र असेल, त्यांना रोगी कसें म्हणतां येईल? नीतीचे संकेत आगंतुक आहेत, निसर्गाचे नियम अटळ आहेत. जीवनाचे सत्यसृष्टींतील नियम आणि स्वप्नसृष्टींतील कल्पनांवर आधारलेले नीतीचे नियम, यांत झगडा सुरू झाला, तर ज्याच्या अंगांत कांही जीव आहे तो निसर्गनियमांप्रमाणेंच वागणार, मग तो नीतीचें ढोंग करो वा न करो.

फ्रॉइडने हें ओळखलें आहे आणि त्यानें असें विधान केलें आहे की पुष्कळांच्या बाबतींत कामवासनेला महत्व असतें, तिचा विषय कोणता याला महत्व नसतें, ती गौण बाब आहे. तो पुढे असेंही म्हणतो की ज्यांना आपण विकृति म्हणतों, त्या सर्व कृति लहान मुलें निसर्गतः करतात. यामुळें त्या विकृतिच नव्हत असें म्हणण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं. पण सवच लहान मुलें विकृत असतात काय? असें म्हणणें हास्यास्पद होअील, पण क्लीबनीतीच्या पुरस्कर्त्यांनी त्याला हाच प्रश्न विचारला आहे. याचा

अर्थ अितकाच होतो की मुलें ज्या गोष्टी निसर्गतः करतात, त्या मोठ्या माणसाने केल्यास त्यांना आपण विकृत म्हणतों, कारण मोठ्या माणसांना क्लीबनीतीचें शिक्षण मिळालेलें असतें आणि त्याप्रमाणें ते वागतात अशी आपली अपेक्षा असते. फ्रॉअिडने तर या तथाकथित विकृतींना बालिश प्रवृत्ति हेंच नांव दिलें आहे. वस्तुतः क्लीबनीतीचें शिक्षण हेंच विकृत आहे. त्याचा पगडा ज्यावर पुरा बसला नाहीं, तो काही बालिश म्हणजे नैसर्गिक, कृति करता आणि डाक्टर त्यांना विकृति म्हणतात. पण हा गैरसमज आहे.

अर्थात याचा खरा अर्थ म्हणजे असाच असतो की नैसर्गिक प्रवृत्तीं-वर दडपण घालण्यास क्लीबनीति भाग पाडते, पण सर्वच माणसांना असें दडपण पूर्णपणें घालण्याची शक्ति नसते आणि कधींकधीं त्यांच्या नैसर्गिक प्रवृत्ति बाहेर डोकावतात. यांनाच डाक्तर विकृति म्हणतात. नैसर्गिक प्रवृत्तींशीं झगडा करावा लागल्यामुळें आणि त्यांना तशी शक्ति नसल्यामुळें त्याचें मन बिघडलेलें असतें हें खरें. पण त्याला उपाय म्हणून त्यांना तीच क्लीबनीति पाळायला लावणें म्हणजे रोगावर उपचार नव्हे. अशानें रोग बळावण्याचाच संभव अधिक. रोग्याच्या मनाची पूर्ण वाढ न होतां तें बालिश राहिलें आहे असें डाक्तर म्हणतो, पण तें खरें नव्हे. मनाची नैस-र्गिक वाढ होण्याला क्लीबनीतीमुळे सवडच मिळत नाही. चालू नीतीच्या विकृत नियमाशीं ज्यांना जुळतें घेतां येत नाही, त्यांना विकृत कसें म्हणतां येअील ?

याचें अेक उदाहरण असें देतां येअील की अेखाद्या कुत्र्याला दोन पायांवर उभें राहून चालायला शिकवलें तर तो तसा चालेल, पण कदाचित् अेखाद्या कुत्र्याला तें साधणार नाहीं, किंवा अेखाद्या वेळीं त्याला चारी पाय टेकावे लागतील, तर या दुसऱ्या कुत्र्याला विकृत म्हणतां येईल काय ? क्लीबनीतीच्या बंधनांचें जे उल्लंघन करतात, ते या दुसऱ्या कुत्र्यासारखे असतात, पण त्यांना विकृत म्हणतां येणार नाही. नैसर्गिक प्रवृत्तींवर समाजाने घातलेलें अनैसर्गिक दडपण त्यांना सहन न झाल्यामुळें ते

समाजाचे नियम मोडतात. ही त्या नियमांची चूक आहे, त्यांची नव्हे, आणि त्यांना रोगी म्हटल्याने क्लीबनीतीचें समर्थन होत नाही.

जगांत अजूनही कित्येक गट असे आहेत की त्यांत समागम म्हणजे पाप समजत नाहीत ती अेक नैसर्गिक गोष्ट समजतात आणि या बाबतींत फारच थोडे निर्बंध असतात. अशा समाजांत वरील प्रकारचे मानसिक रोग मुळीच दिसत नाहीत आणि तेथें मनोविश्लेषणकारांची बिलकुल गरज नसते. हा क्लीबनीतीविरुद्ध पुरावा आहे. या नीतीमुळेंच हे रोग उत्पन्न होतात हें यावरून उघड होतें.

शिवाय क्लीबनीतीचा पुरस्कार करणाऱ्या समाजांतही कित्येक वेळां बंडखोर निपजतात. उदाहरणार्थ मॉर्मन नांवाचा अेक पंथच अमेरिकेंत निघाला होता, त्यांत क्लीबनीतीच्या निर्बंधाना फाटा दिलेला होता आणि ते वेगळाच गट करून राहिल्यामुळें कित्येक वर्षे ते सुखांत राहिले, पण शेवटीं उपद्व्यापी लोकांच्या कारस्थानांमुळें त्यांचा छळ होऊन त्यांना तो बंद करावा लागला. असा वेगळा गट न करतां कित्येक बुद्धिवादी लोक क्लीबनीतीचा धोका ओळखून अशा निर्बंधांना धाब्यावर बसवतात आणि स्वतःचें कोणत्याही मार्गानें समाधान करून घेतात. जे समजून उमजून असे वागतात, त्यांना आपण पाप करतों असें वाटतच नसल्यामुळे मनस्ताप होत नाही आणि तेही सुखी होतात. क्लीबनीतीने कोणत्याही समाजाचें कधीं कल्याण झालेलें नाही. कदाचित् कांही डाक्तरांचें पोट भरत असेल, पण हा समाजाचा फायदा नाही.

कित्येकांनीं फ्रॉअिडच्या मतावर अशी टीका केली आहे की हें मत केवळ रोग्यांच्या परीक्षणावरून बनवलेलें आहे, तें निरोगी माणसांना लागू नाही. या टीकेला फ्रॉअिडच्या अनुयायांना धडधडीत उत्तर देतां आलें नाही. पण बुद्धिवाद्यांना समर्पक उत्तर देतां येईल. तें असें कीं ज्यांना वेडच लागल असेल असे लोक सोडले, तर ज्यांना फ्रॉअिडचे अनुयायी रोगी

म्हणतात, ते खरे रोगीच नसतात. क्लीबनीतीचे निर्बंध ज्यांना पूर्णपणें पाळणें अशक्य होतें, किंवा जे जाणूनबुजून ते निर्बंध धुडकावून लावतात, असेच ते लोक असतात. ते निसर्गाच्या अधिक जवळ असतात, कृत्रिम निर्बंधाच्या दडपशाहीला मान तुकवणें त्यांना शक्य होत नाही. त्यांची कामवासना इतरांपेक्षा अधिक तीव्र असेल, पण म्हणून कांही तो रोग ठरत नाही. भूक जास्त लागणें हा जसा रोग नव्हे, तसाच ताही रोग नव्हे. अशा लोकांना रोगी समजून उपचार करणें ही फ्रॉइडची चूक आहे. क्लीबनीतीच्या दृष्टानें समागम केवळ प्रजोत्पत्तीपुरताच असावा, पण ही अत्यंत कृत्रिम कल्पना आहे हा चुकीचा सिद्धांत मान्य करून त्याकरतां मनावर पुरेसें दडपण ज्यांना घालतां येत नाही, त्यांना रोगी म्हणतां येत नाही. निसर्गाविरुद्ध त्यांना जातां येत नाही इतकेंच, पण हा रोग नव्हे. समागमाला पाहिजे तर पाप म्हणावें हा धार्मिक शब्द आहे, त्याचा आरोग्याशीं संबंध नाही. पाप म्हणजे रोग नव्हे. शरीराच्या नैसर्गिक शक्तींत कांही बिघाड होईल तरच तो रोग म्हणतां येईल. समागम जरी निषिद्ध मानला, तरीही समागमाच्या प्रवृत्तीला रोग म्हणतां येणार नाही. या अपप्रयोगावर फ्रॉइडचें सर्व शास्त्र आधारलेलें आहे. तो एके ठिकाणी म्हणतो की सामाजिक निर्बंध न मानतां कामवासनेचा पगडा चालू देणें म्हणजेच मानसिक रोग. हें विधान अत्यंत हास्यास्पद आहे. निर्बंध कृत्रिम आहेत, कामवासना नैसर्गिक आहे. या कृत्रिम निर्बंधांनाच वास्तविक रोग म्हटलें पाहिजे. नैसर्गिक गोष्टींना रोग म्हणण्यापेक्षां अधिक हास्यास्पद काय आहे? कामवासना ही प्रकृति आहे, विकृति नव्हे.

फ्रॉइड क्लीबनीतीला शरण गेल्यामुळें रोग्यांची व्याख्या करतांना त्याची त्रेधा उडाली आहे. समसंभोगाविषयीं तो म्हणतो, अशा लोकांना रोगी म्हणावें तर त्यांच्या कामविषयक वागणुकींत लिंगभेदापलीकडे कांहीच फरक आढळत नाही, ती सामान्य माणसांच्या वागणुकीशीं तंतोतंत जुळते. तो नंतर म्हणतो, समंजस मनुष्याला जें रास्त व अिष्ट वाटतें, त्याच्या पली-

कडे जाणारा तो रोगी. समसंभोगी लोकांची संख्या अितकी मोठी आहे की त्यांना रोगी कसें म्हणावें असा त्याला पेंच पडतो. बरें, समंजस मनुष्य नक्की काय म्हणेल हें कसें ठरवावें? अेखाद्या धार्मिक प्रचारकाला जें समंजस वाटेल, तें बुद्धिवादी माणसाला वाटणार नाही. तेव्हां यांतून रोगाची व्याख्याच निघणें कठिण आहे. समंजस व्याख्या अशीच करावी लागेल की जोंपर्यंत कामतृप्तीची क्रिया अेकच आहे, तोंपर्यंत कोणालाही रोगी म्हणतां येणार नाही. फ्रॉअिडनेही हें जवळ जवळ कबूलच केलें आहे आणि यामुळेच त्याची त्रेधा झाली आहे. कलबनीतीचे दंडक शास्त्रीय दृष्टया मान्य करतां येत नाहीत याची त्याला वारंवार जाणीव होत असें दिसतें.

संभोगाचा धोपट मार्ग कसा ओळखावा, यासंबंधी फ्रॉअिडने कांही दंडक घातले आहेत. १. संभोग करणाऱ्या दोन व्यक्ति भिन्नलिंगी असल्या पाहिजेत, व २. त्यात दोघांच्या जननेंद्रियांचा संयोग झाला पाहिजे. जेथे प्रजोत्पत्तीचा प्रश्न असेल तेथें हे दंडक ठीक आहेत, कारण व्यक्ति भिन्नलिंगी असल्याशिवाय प्रजोत्पत्ति शक्य नाही. पण कामतृप्तीचें तसें नाही. ती समसंभोगानें किंवा स्वसंभोगानेही होऊं शकते. कामतृप्ति आणि प्रजोत्पत्ति या दोहोंत घोटाळा केल्यामुळेंच हे दंडक उत्पन्न झाले आहेत हे उघड आहे. भिन्नलिंगी व्यक्ति असल्या तरी त्यांच्या समागमापासून नेहमीच प्रजोत्पत्ति होते असें नाही, तेव्हां संभोगांत प्रजोत्पत्ति हीच गोष्ट महत्वाची आहे असें म्हणण्यात अर्थ नाही. निदान कोणाही सामान्य माणसाच्या दृष्टीने कामतृप्ति हीच मुख्य गोष्ट आहे आणि ती साधताना क्वचित् अखादे वेळीं प्रजोत्पत्ति होते. तेव्हां प्रजोत्पत्तीला फाजील महत्व देण्यांत अर्थ नाही. कित्येकांना प्रजोत्पत्ति ही आपत्तिच वाटते, ती होत नसती तर बरें असें पुष्कळांना वाटतें. पण फ्रॉअिडच्या म्हणण्यामागें प्रजोत्पत्ति आणि कामतृप्ति या दोहोंची जेथें फारकत होअील, म्हणजे ज्यात प्रजोत्पत्ति शक्य नाही असे कामतृप्तीचे सर्व मार्ग त्याच्या मतें विकृतींच्या सदरांत जातात.

या व्याख्येनें कलबनीतीला पाठिंबा मिळतो हें खरें, पण ज्या नीती-

मुळें फ्रॉअिडच्याच मताने रोग उत्पन्न होतात, ती तेवढी नैसर्गिक म्हणजे प्रकृति, आणि बाकी विकृति, असें कसें म्हणतां येअील? तसें म्हटल्यास संततिनियमनाचीं साधनें वापरणें म्हणजेही विकृतिच म्हणावी लागेल!

याचा अेक परिणाम असा होतो की फ्रॉअिड ज्यांना रोगी म्हणून उपचार करू पहतो, त्यांची प्रकृति सुधारण्याऐवजीं कधींकधीं अधिकच बिघडते, किंवा निदान ते बरे होत नाहीत. ज्या उपचारांचा पायाच चुकलेला आहे, ते लागू पडले नाहीत तर आश्चर्य नाही. नैसर्गिक काय आहे आणि रोग कोठें सुरू होतो, हें ते रोग्याला सांगूं शकत नाहीत, कारण यावर खोल विचार त्यांनी केलेला नाही. चालू व्लांबनीतीचे दंडक शास्त्रीय दृष्ट्या चुकलले आहेत असें स्पष्टपणें सांगायला ते धजत नाहीत, किंवा त्यांनाच तें स्पष्टपणें समजलेलें नाहीं. कांहीं असो, फ्रॉअिडच्या मनोविश्लेषणशास्त्रावर नीतीचीं तत्वें आधारतां येणार नाहीत हे उघड आहे. रोग नसतांनाच जर रोगी समजून उपचार करू लागलें तर ते यशस्वी व्हावे कसे? कोणी तशी कल्पना करून स्वतःला रोगी समजत असेल, तर तुला रोग नाही असें डाक्तराने सांगणें जरूर असतें. व्लांबनीतीचे दंडक न पाळणें हा रोग नव्हे, कारण हे दंडकच निसर्गाच्या विरुद्ध आहेत. डॉ. फ्रॉअिड यांना हें समजण्याअितकी अक्कल नव्हती असें नाही, कारण ते अेके ठिकाणीं स्पष्ट म्हणतात की ज्याला आम्ही विकृति म्हणतों, अशा प्रवृत्ति अितक्या लोकांत सांपडतात, की ती विकृति नसून प्रकृतीचाच अेक प्रकार आहे की काय अशी शंका येते. शेवटीं हें कबूल करणें भागच पडतें की मनाला जी कांही विकृति आली असेल, ती केवळ नैसर्गिक प्रवृत्ति दडपून टाकण्यांत यश न आल्यामुळें झालेली असते. ती चालू नीतीची चूक आहे, प्रकृतीचा दोष नव्हे.

---

# अेक करतां अेक !

लेखक : स० हृदय, बी. अे., महाड.

दहाबारा दिवसांनंतर दोघी मैत्रिणी भेटल्या होत्या.

" आज अशी बावरलेली कां दिसतेस, रतन ? " शैलाने विचारलें.

" तुझा आज सल्ला विचारायला आलें आहे मी. "

" तो फुकट द्यायची तयारी आहे माझी ! विचार काय तें. "

" कसें सांगूं तुल सारें ? " रतन लाजूं लागली. पण तें सांगणें भागच होतें म्हणून कांहीसे आढेवेढे घेऊन ती शैलाला आपली हकीकत सांगूं लागली

" तुला माहीत आहे, शैलू. माझ्या लग्नाला अकरा वर्षें झालीं. या अवधींत नाही म्हटलें पांचसहा वेळां जागा बदलल्या आहेत मी. तीच ती अिमारत, त्याच त्या खोल्या आणि तेंच तें वातावरण, नकासा होओ माझा जीव. म्हणून दादरपासून कोटापर्यंत जागा घेतल्या. चार दिवसांपूर्वीची गोष्ट. सँढर्स्ट रोडवरच्या आमच्या जागेंतल्या रस्त्यावरच्या खिडकींत मी उभी होतें. ते नुकतेच हपिसांतून आले होते. आणि दुसऱ्या खिडकीजवळच्या टेबलापाशीं चहा पीत बसले होते. ते आनंदांत होते, मीही खुषात होतें. तोंच माझी नजर रस्त्यांतून जात असलेल्या निरंजनकडे गेली. "

" हा कोण निरंजन ? "

" कसें विसरलीस तूं त्याचें नांव ? मी ज्याच्याशीं लग्न करायची प्रतिज्ञा केली होती, माझा बालपणचा मित्र . "

" हं हं, आठवतें. बोलली होतीस खरी अेकदां तूं. "

" मला वाटलं तो माझ्याकडे बघत असावा. त्याला पाहतांच मी भान विसरलें. त्याला भेटण्याची अिच्छा अनिवार झाली मला, आणि त्यानें माझ्याकडे यावें म्हणून मी ' त्यांना ' न दिसेल अशी खूण केली. तो यऊं

लागला. अितक्यांत ‘ त्यांना ’ मला वाटतें माझी खूण समजली. ते खिड-कींत आले. त्यांना पाहतांच निरंजन जणू कांही झालेंच नाही असें भासवून निघून गेला.”

“ मग काय म्हणाले तुझे वसंतराव ? ”

“ म्हणाले, ‘ कुणाला खूण केलीस तूं ?, ” ते खिडकींत उभे होते.

“ मी म्हटलें, ‘ कुणाला नाही. ’ मी आंत आलें होतें. ”

“ ‘ खोटें, खोटें बोलतेस तूं. मला अितके दिवस संशय येतच होता. त्यांनी खिडकीबाहेर पाहिलें. ‘ तुझें पाप तुझ्या पदरांत घालतों अेकदां मी, ’ असें बोलत ते कोट, ॅट घालून बाहेर गेले. मी त्यांना झपझप पावलें टाकतांना आणि ट्रॅममधें चढतांना पाहिलें. ”

“ अजून त्यांचा संशयी स्वभाव गेला नाही अितक्या वर्षांत ? ”

“ कधींकधीं बेचैन होतात ते. सुंदर आहे ना मी ? म्हणून. ”

“ गरीब बिचारी रतन. मग रडतेस तूं ? ”

“ काय करूं मी ? ”

“ सहन करावें. काय करायचें दुसरें ? ” शैलाने सुचवलें.

“ नाही. आतां माझ्या मनांत आव्हानाची अीर्षा उत्पन्न होऊं लागली आहे अनेक कारणांमुळे माझी खात्री झाली आहे. ते बरेच वेळां बाहेर जातात आणि उशीरां घरीं येतात. म्हणे मी खालच्या मजल्यावर बुद्धिबळें खेळायला जात असतों. बसतात कधींकधीं खेळत खरे, पण बरेच वेळां ते तेथे नसल्याचें मला कळलें होतें. ते संशयी आहेत, मी कांहींअेक न करतां...पण ते कांही कां करीनात ? माझें जोवर ठीक चाललें आहे, तोंवर आपण संशय व्यक्त करण्याचा दुबळेपणा दाखवू नये हें चांगलें. येतील आपोआप ताळ्यावर कधींतरी, म्हणून मी गप्प बसलें होतें. ”

“ मग आतां काय झालें ?.. गप्पशी बसलीस ? ”

“ मला पातळें, ब्लाऊज, वारंवार बदलावेसे वाटतात. हें अितर स्त्रियांप्रमाणेंच आहे असें तूं समजशील. जागाही रोज नव्या नव्या असा-

व्यात असें मला वाटतें. यावरून मला सातत्याचा कंटाळा असावा असा मानसशास्त्रानें तूं माझ्या वृत्तीचा अर्थ लावशील. तें ठीक आहे, पण, पण कसें सांगूं तुला मी, शैला ?"

" सांग. काय सांगणार आहेस तें मला माहीत आहे. कॉलेजपासून मी तुला ओळखतें आहे." शैलेने तिला धीर दिला.

" त्याच त्या अेका पुरुषाचा, नवऱ्याचा कंटाळा नाही का येणार माणसाला ? सहानुभूतीनें समजून नको का वागायला त्याने ? मी वासनेच्या दृष्टीनेच बोलत नाही केवळ. खोलींतलें सामान आपण निरनिराळया प्रकारांनीं लावतों, जुनें बदलून नवीन घेतों, पडदे बदलावे म्हणून छान छान नवीन कापडें आणतों, पण...... "

" नवरा बदलतां येत नाही स्त्रीला, खरें ना ?"

" हं !" रतनने अेक श्वास सोडला.

" खरें आहे. अगदी शंभर टक्के सत्य आहे तूं म्हणतेस तें."

" शैलू, तुलाही तसें वाटतें ?"

" कोणालाही वाटेल. आश्चर्य कसले त्यांत ? मलाही वाटतें."

" कित्ती कित्ती माझी जिवाभावाची मैत्रीण आहेस तूं, शैलू !" रतन शैलाला अगदी खेटून बसली, तिने शैलेचा हात आपल्या हातांत घेऊन दाबून धरला.

" झालें ? अितकेंच ?"

" म्हणजे ? आणखी काय करूं मी ?" रतन हंसली.

" निदान प्रेमातिशयानें माझा पापा तरी घेशील ?" शैला हंसली.

" चल ! मोठी खव्याळ आहेस तूं, शैलू."

" कबूल ! म्हणून विचारतें की वसंतरावाप्रमाणें तुलाही रुचिपालट करावासें वाटूं लागलंय की काय ?"

" काय उत्तर देऊं मी ?"

" खरें बोललें पाहिजे हं, रतन. माझ्या गळयाची शपथ आहे गडे. " शैला रतनच्या गळयांतच पडली.

' त करतात तसें आपल्याला करायला काय हरकत आहे? असें वाटतें खरें कधींकधीं. त्यांनी...काय म्हणतात तें...बाहेर पाऊल टाकलें, मग मला तरी कां आडकाठी असावी? मीच काय गुन्हा केला? अेखादे वेळेस चीड उत्पन्न होते, आणि वाटतें आपणही तसेंच वागावें तर काय बिघडेल ? "

" मग मिळाली का कधीं तशी संधि तुला ? "

" नाही, मन धजत नाही. मी हिंदु आहें, त्यातून स्त्री आहें. मला पतिव्रता राहिलें पाहिजे. नाहीतर पंचकन्या मला काय म्हणतील ? " निराशेच्या स्वरांत रतन जणूं आपल्याशींच विनोद करीत होती.

" अेक प्रश्न विचारूं का तुला मी ? "

" विचार ना ! "

" निरंजनने तुला संधि दिली नाही ? "

" नाही बिचारा प्रेमभंगाने खचून गेलाय्. माझ्या पहिल्या बिऱ्हाडीं आला होता अेकदां. मी यांच्याशीं निष्ठेने रहायचें ठरवल्यामुळें त्याला जास्त त्रास होऊं नये म्हणून मी पत्रव्यवहार सुद्धां ठेवला नाही निरंजनशीं. आणि मी नेहमी जागा बदलतें, त्यामुळे अितक्या वर्षांत दिसला तो अचानकपणें परवा सँढर्स्ट रोडवर. मला आनंद झाला, म्हटलें आला वर तर बोलत बसूं. म्हणून त्याला माझ्या नकळतच खूण केली. "

" मग तसें कबूल करायचें की वसंतरावांजवळ ! खोटें कां बोललीस ? "

" निरंजनाला काय वाटलें कोणाला ठाऊक, तो चोरटेपणाने निघूनच गेला. त्यामुळें खरं सांगितलें असतें तर निरंजन वर न आल्यामुळें माझ्यावर खोटेपणाचा आळ आला असता आणि त्यांच्या अपरोक्ष माझे

कोणाशीं तरी चोरटे संबंध असतात असें माझ्या तोंडानेच सिद्ध झालें असतें."

"नाहीतरी वसंतरावांना वाटतेंच नाही का तसें ?"

"वाटेना ? ता त्य चा दुबळेपणा आह."

"बरं, मग पुढ काय झालें ?"

"त्या रात्रीं ते घरीं आले आणि कधीं नाही असे प्रेमातिशयाने वागूं लागले माझ्याशीं. काय सांगूं ? काय वाटेल तें केलं कौतुक त्यांनी माझें. मला तर मेल्याहून मेल्यासारखें झालें होतें."

"पण त म्हणाले तरी काय ?"

"म्हणाले, 'ज्या माणसाला तूं खूण केलीस असें मला वाटलें, त्याला मी ट्रॅममध्यें चढतांना गाठलें. त्याच्या शेजारींच बसलों, त्याच्याशीं बोलणें काढलें, त्याच्या घरापर्यंत गेलों. त्याने मल चहाला आंत बोलावलें, मी गेलों, अणि सहज त्याला बोलतां बोलतां विचारलें की मघां तुम्ही सँढर्स्ट रोडवरील मारा बिल्डिंगमधील कोणा बाईला कांहीतरी करपल्लवी करतांना पाहिलें का ? तो म्हणाला, तुम्हाला पाहिलें खिडकींत, पण कोणा बाअीला पाहिलें नाहीं. त्यामुळें माझा संशय पार गेला, आणि तुझ्यावर माझा उगाच संशय आहे अशी पूरेपूर खात्री झाली. क्षमा कर मला. करशील ना ?"

"अस्सं ! अेकूण वसंतराव दुसऱ्या कोणाच्या तरी मागें गेले होते. कमाल झाली मूर्खपणाची ! बरें झालें सुटलीस तूं त्यांच्या काचांतून."

"नाही त्यांच्यामुळें उलट नको तें संकट आलें माझ्यावर."

"तें कसें ?"

"दुसऱ्या दिवशीं रात्रीं ते बुद्धिबळें खेळण्यासाठीं खालच्या मजल्यावर गेले मी अेकटीच वाचीत बसलें होतें, तों दरवाजावर मला टिक् टिक् अेकू आली. मला वाटलं तेच असावेत, म्हणून मी आदल्या रात्रींच्या आनंद वृत्तीला जागून हंसत हंसतच दरवाजा उघडला. पाहतें तों कोणी-

तरी अेक तरुण उभा होता माझ्यासमोर!"

"मग ग?"

"तो सरळ आंत आला आणि माझ्याकडे पाहून हंसला. त्याने आपली हॅट खुंटीवर ठेवली आणि कोचावर बसला. मी म्हटलें, 'काय पाहिजे?' तो पुन्हा हंसला. कसं सांगूं, शैला? माझ्या तोंडचें पाणी पळालें. माझ्या अंगाला घाम सुटला. तो बोलूं लागला, 'काल येथे खालीं रस्त्यावर उभा होतों, तुम्ही कोणालासें वर बोलावलेलें मी पाहिलें. कोणाला बोलावलें म्हणून मी पाहिलं, तों तुम्ही आंत गेलां आणि अेक पुरुष खिडकींत येऊन माझ्याकडे रोखून बघूं लागला. तो असा मूर्ख की माझ्या मागोमाग घरापर्यंत आला. तो म्हणाला, 'त्या बाअीने तुम्हाला खुणा केल्या का?' मी मनांतून हंसतच होतों, पण तें कबूल करण्याअितका मूर्ख नव्हतों. खुप बोलला तो अिसम. मी त्याला सहज विचारलें, 'कोण ती बाअी?' तो म्हणाला, 'आहे ती अशीच,' आणि तो हंसला. तेव्हां मला वाटलें की मलाच तुम्ही बोलावलें. आणि आलेली संधि आपण कां घालवावी, म्हणून आलोंय् मी. घाबरूं नका.' मी त्याचें बोलणें जीव मुठींत धरून अैकत होत. तोंपर्यंत अेक अक्षरही काढलें नाहीं तोंडांतून."

"अग पण सांगायचें की, मी त्या गृहस्थाची धर्मपत्नी आणि ते संशयाने विचारायला गेले होते तुमच्याकडे." शैला उद्गारली.

"सांगितलें, सर्व कांही सांगितलें. पण त्याला तें पटेना. मी जास्त पैसे उकळण्याकरतां कांहीतरी बहाणा करतें, असें त्याला वाटलें. तो अैकेचना. तो जवळ आला. माझा हात धरला त्याने. खुप ओरडावेंसें वाटलें मला, पण कशी ओरडूं मी? त्यांचा संशय अशानं खरा ठरला असता." रतन थांबली.

"मग काय केलेंस तूं?"

"खुप सांगून पाहिलें. विरोध केला मी त्याला. पण ते म्हणाला 'बऱ्याच गर्ती स्त्रिया असेंच करतात, अशाच वागतात नव्या पुरुषाजवळ.'

तो अैकेना. ते खालून वर येतील ही भीति क्षणाक्षणाला वाढत होती. घड्याळाकडे पाहिलें तों सवादहा वाजले होते. साडेदहाच्या सुमारास ते वर येतात. पंधरा मिनिटें बाकी होतीं."

'काय केलेंस तूं?' उत्सुकतेने शैलाने विचारलें.

"जाऊ दे ही ब्याद अेकदांची लवकर, असा विचार केला मनाशीं नि...." रतन लाजली. तिनें तोंड खाली घातलें.

"अरेरे! गरीब बिचारी माझी रतन! शैलेनें खरेंच सहानुभूतीनें तिच्या पाठीवरून हात फिरवला. "मग तरी गेला का तो लवकर?"

"हो गेला, पण जातांना तो दहाची नोट टेबलावर ठेवून गेला, हें मला माहीत नव्हतें. हे काय झालें, अशा हताश वृत्तीनें मी कोचावर पडलें होतें, तों ते आले. त्यांनी टेबलावरची दहाची नोट पाहिली."

"मग काय म्हणाले ग वसंतराव तुला?"

"हंसतच ते म्हणाले, 'पैसे असे वाऱ्यावरसे उडूं लागले आहेत?" त्यांना कसलाच संशय आला नाही. तें अैकतांच मला धीर आला. 'मघाशीं मनीबॅग उघडली होती, त्यांतून राहिले वाटतें,' असें म्हणून मी ते घतले नि ठेवून दिले"

"बाकी कशानें नाही ना संशय आला त्यांना?"

"नाही. शक्य ती काळजी घतली होती मी."

"शाब्बास!" शैलाने रतनची पाठ थोपटली.

"जा गडे!"

"का, आतां कां? तुला पुष्कळ दिवस पाहिजे असलेली संधि तुझ्या वसंतरावांनीच आणून दिली तुला आनंद वाटला पाहिजे."

"चल, वात्रट कुठली? अग पण अेक सांगायचें राहिलें. तो जातांना म्हणाला, 'येअीन पुन्हा केव्हां तरी."

"असें असें! त्याला आवडलीस म्हणायची तूं?"

" आत कसें करायचें तो पुन्हा आला तर? जागा बदलायचें म्हटलें तर बारा महिने झाले नाहीत या जागेत येऊन. कोणत्या तोंडानें त्यांना सांगू जागा बदलायला?"

" तें जाऊं दे. तो कसा काय होता ग अिसम ? "

" दिसायला चांगला उमदा होता, तरुण होता. "

" पुरे पुरे, समजलें मी तुलाही तो आवडला म्हणायचा. तें जाऊं दे. माझें अैकशील? तो पुन्हा आला म्हणजे माझा पत्ता देऊन त्याला अिकडे पाठव. मी पाहीन काय करायचें तें. "

" बरें पाठवीन. त्याला खरें सांग नि लाव अेकदां वाटेला. "

" बरं पण, निरंजन आला होता का तूं बोलावल्याप्रमाणें ? "

" हो, काल दोनप्रहरीं ता येवून गेला. "

" त्याला तूं बोलावला होतास, लहानपणापासून तुमचें दोघाचे प्रेम होतें. मग तरी जमला का खुशीचा सौदा ? "

" खरें सांगायचें म्हणजे माझ्या मनांत त्याच्या गळयांत पडून त्याला माझा म्हणण्याची अिच्छा फार तीव्र होत होती. पण बाअी परवांच्या त्या अचानक प्रकारामुळें मनाला सारखी बोंचणी लागून राहिली होती. "

" नि निरंजनने पण कांही प्रयत्न केला नाही ? "

" नाही. नुसताच चहा प्याला नि गेला निघून "

---

# ' एक होता म्हातारा '

श्री. रांगणेकर हे बरेच लोकप्रिय नाटककार आहेत आणि कमाअीच्या दृष्टीनेंही त्यांना यश मिळाले आहे यांत शंका नाही. त्यांना प्रेक्षकांची नाडी सांपडल्यामुळें ते हमखास यशस्वी नाटकें लिहूं शकतात, अशीही वदंता आहे, तथापि त्यांच्या अत्यंत लोकप्रिय झालेल्या 'कुलवधू'पासून तो

'अेक होता म्हाता ।' या नवीन न टकापर्यंतच्या सर्व नाटकांवरून चाणाक्ष प्रे कांच्या नजरेस अे च गोष्ट येते, ती ही की या सर्व यशाचें श्रेय नाटकांच्या गुणांना नसून नटनटींच्या गुणांना आहे. ते हां श्री. रांगणेकरांना जें यश मिळ लें आहे, तें मुख्यत: चांगलें नाटकें लिहिण्यात नव्हे, तर चांगला नटसंच अेकत्र आणण्यात. अर्थात् हा ी महत्वा ी बाब आहे. आणि याबद्दल त्याचें अभिनंदन करणें जरूर आहे. आणखी अेक महत्वाचा मुद्दा म्हणज स्त्रियांच्या भूमिका पुरुषांनीच कराव्या असें म्हणणारे कांही आंबटशो की सोडल तर खऱ्या रसिक प्रेक्षकांना आतां हिजड्याची कामें पाहून किळस येतो आण स्त्रियाच्या भूमिका स्त्रियानाच दणारी दुसरी कोणतीही नाटकमंडळी टिकून राहिलेली नाही.

नाटक म्हणून पाहतां 'अेक होता म्ह त रा' हें अत्यंत गचाळ आहे, परंतु सर्व नटनटी आपापलें काम शक्य ततकीं चांगलीं करतात. अर्थात् न टकांतच काही दम न ेल तर तथें बिचारा नटसंच काय कर ल ? या नाटक त नाना नांवाचा म्हातारा व त्याचा दीनानाथ नांवाचा मुलगा आहे. य मुलाचें म्र ल ता न वाच्या मुलीशीं दोन वर्षांपासून ठरलेलें आहे, परंतु तिच्या आअीन आपल्या भ वाची पोरका मुलगी उमा हिला आपल्या घरीं रहायला अ णल्य पासून दीनानाथचें लक्ष ललितेवरून उडून उ कडे लागतें व तो तिच्याशींच लग्न करणार असें म्हणूं लागतो. आअीला हे पाहवत नाही व आपल्या मुलीच्या मार्गांतून उचा कांटा काढण्याक तां, अ पण केलेल्या उपका ची तिला अ ठवण देऊन, दीन नाथ कांही दिवस ब हेरगांवीं गेल असतां ती तिचें लग्न नानांशीं लावून देते. आतां तर दीन नाथ झक मारत तिचा नाद सोडाल की न ही ? तो अेक महिन्याने प न येतो तों उमा त्याची आअी होऊन घरीं हायल आलली पाहतो. तो प्रथम डोक्यांत राख घालता, पण शेवटीं उमेच्या आग्रहाने ललितेशीं लग्न करायला तय र होता त्याला ललितेचें व तिच्या आअीचें कारस्थ न स्पष्ट दिसतें आणि त्यान त्यांना खूप शिव्या दिल्या ळें आअी

चिडून त्याला मुलगी देण्याचें नाकारते, पण नाना तिच्या पायां पडतात आणि शेवटीं हें लग्न लागतें या आअीचा बळिराम नांवाचा भाऊही या ना कांत आह, परंतु त्याचा नाटकाशा कांही संबंध नसून त्याच्याकडे केवळ हास्य उत्पन्न करण्याचें काम आहे

यांतील ज्या मुख्य घटनेवर नाटक आधारलेलें आहे, तें नाना व उमा यांचें लग्न अितकें अस्वाभाविक आहे की त्यामुळें सर्व नाटकाचा नाश झाला आहे. या घटनेमुळेंच नाट्य उत्पन्न होतें, तेव्हां ती योग्यच आहे, असेंही कांही विद्वान म्हणतात, परंतु नाट्य उत्पन्न करण्याकरतां पाहिजे तें करण्याची परवानगी चांगल्या नाटककाराला नसते. नाटककाराने निवडलेलीं पात्रें जर जिवंत वाटायला पाहिजे असलीं, तर तीं खऱ्या माणसांप्रमाणें आपापल्या स्वभावाला धरून वागलीं पाहिजेत. त्यांचे स्वभाव कसे असावे हें अर्थातच आरंभी नाटककाराच्या मर्जीवर असतें, परंतु अेकदां हीं पात्रें निवडलीं, म्हणजे त्याला तीं आपल्या मर्जीप्रमाणें पाहिजे तशीं वांकवतां येत नाहीत. आपल्या स्वभावाचें बंधन त्यांना झुगारतां येत नाही. हा नियम सर्व कथावाङ्मयाला लागू आहे आणि जे लेखक तो पाळीत नाहीत, ते कधाही उच्च दर्जाला पोचत नाहीत.

हा म्हातारा या वेळीं ४४ वर्षांचा, मुलगा २२ व उमा १८ वर्षांची असते. म्हातारा अत्यंत सालस, अितकेंच नव्हे तर मुलाला सावत्र आअीचा जाच नको म्हणून आठ वर्षें विधुर राहिलला आहे. मुलाला मी मित्राप्रमाणें वागवतों, अशी त्याला घमेंड आहे आणि तरीही मुलाच्या अेका मित्राच्या गैरहजेरींत ता लग्न करून मोकळा होतो याला अेक सबब अशी दाखविली आहे की चांगली मुलगी पाहून तुम्ही लग्न करा, असें मुलाचें पत्र आलें आहे. पण मुलगी [illegible] आहे की नाही याबद्दल मुलाचें (मित्राचें) मत घ्यायला त्याला फुरसत नाहीं. त्याला अितकी घाआ कां झाली, याचें कोणतेंही कारण दाखवलल नाहा मुलगी अतिशय सुंदर असल्यामुळें त्याच्या मनाची चलबिचल होऊन त्याला मोह पडला, असेंही दाखविलेलें नाही. तो

अगदीं शांत आहे. ललितेच्या आओीने कांही कारस्थान रचून त्याला भयंकर पेंचांत पकडलें आहे असेंही नाही. उमा तिचें अैकते, तें केवळ तिच्या उपकारांमुळें, पण नाना कां अैकतात? आठ वर्षें विधुर राहिलेला हा म्हातारा अेकदम मुलाच्या नकळत लग्नाला कां तयार व्हावा? त्याचा स्वभाव दुष्ट नाही. आपल्याला तरुण बायको मिळते आहे ना? मग तिला काय वाटेल हें पाहण्याचें कारण काय? असें वाटण्याअितका तो दुसऱ्याबद्दल बेपरवा नाही. सारांश ही वागणूक त्याच्या स्वभावाविरुद्ध आहे आणि त्याला कोणतेंही कारण नाहीं.

बरें, मुलगा अितका चिडला तरी त्याला तेथून निघून जावें हें सुचत नाही. तो स्वतःचें पोट भरणारा मुलगा आहे, तरी तो तेथेंच राहतो आणि ज्या मुलीवर त्याचें प्रेम नाहीं, तिच्याशीं लग्नाला तयार होतो आणि बापाला हें माहीत असताही तो त्याला भर देतो अितकेंच नव्हे तर आओी आपली मुलगी देत नाही असें अैकल्यावर तो तिच्या पायां पडतो. अशा लग्नापासून मुलाला सुख होणार नाही हेंही त्याला दिसत नाही. आणि म्हणे हा मुलाला मित्रासारखा वागवतो!

नाटकांत किरकोळ दोष पुष्कळ दाखवतां येतील, पण या ठिकाणी दोषांपुढें त्यांचें महत्व नाही. उमा दीनानाथाला उपदेश करतांना म्हणते 'तुम्ही दोन वर्षेपर्यंत नवराबायकोसारखीं वागत होतां.' हें वाक्य चुकून पडलेलें नाही, कारण तें दोन तीन वेळां आलेलें आहे. या वाक्याचा जो सरळ अर्थ होतो, तो लेखकाला अभिप्रेत असावा असें दिसत नाहीं. पण या नाटकाची अधिक छाननी करण्यांत मतलब नाही.

---

# अहिंसकाची स्त्रीहिंसा

लेखक, वि. वि. लिमये, पंढरपूर.

वर्तमान कालांतील आपल्या भारताचे अहिंसातत्वज्ञानाचे प्रणेते महात्मा गांधी यांच्या तत्वनिष्ठ नि अंधश्रद्ध दोन शिष्यांचें उदाहरण देत आहें. हे दोन्ही शिष्य महात्माजींच प्रथमश्रेणीचे दे. भ. विनोबा भावे, साने गुरुजी, आदि यांच्या जवळच्याच पातळीवरील, इतके मोठे मानले जाणारे आणि खरोखरच त्यांची निष्ठा, विचार, कांहीं आचार, आहार, पेहराव, सर्वच गांधीतत्वानुरूप असल्यामुळेंच लोक त्यांना मोठे मानतात.

**पहिला नमुना.** ब्रिटिश राजसत्तेंतील भरपूर पगार व पेनशन देणारी नोकरी निमीहिमी अनुभवल्यावर तीवर लाथ मारून गांधींना सामील झाल्यावर हा स्वार्थत्याग उच्च कोटीचा कोण म्हणणार नाहीं? अशा अेका स्वार्थत्यागी दे. भ. नी जनरूढीप्रमाणें प्रपंचाचा अनुभव पूर्ण घेतल्याने दोनतीन मुलगे व अेकदोन मुली असा त्यांचा परिवारही होता. सन १९३०-३२ च्या देशव्यापी चळवळीचे वेळीं आमच्या अेका मित्रानें या दे. भ. ची आमचेजवळ खूप वाखाणणी केली व हे आपल्या पत्नीला मातेसमान मानतात, येथपर्यंत वर्णन केलें. आमचे मित्र जेव्हां कारागारांतून परत आले, आणि आम्हीं दे. भ. ना कन्यारत्न झाल्याचें सांगितलें, तेव्हां त्याचा चेहरा पाहण्याजोगा होता! आम्हीं मनांत म्हटले, 'देवाची करनी नि नारळांत पानी!' वरील दे. भ. या कार्यांत सहकुटुंब, सहपरिवार पडले असल्याने पत्नीही त्यांचे मतानुसारच वागत असली पाहिजे! तरी आम्हाला यांत कांहीं विशेष वाटलें नाहीं. निसर्गनियमानुसारच सर्व घडलें. मात्र कामदेवाने आपलें वर्चस्व कोणावर बसवलें, दे. भ. वर की त्यांचे पत्नीवर, हें कळणें अगदींच अशक्य!

**दुसरा नमुना.** त्याच चळवळीच काळची गोष्ट अेक तरुण, उंचेपुरे, गोरे, दणदणीत प्रकृतीच गृहस्थ महात्माजींचे शिष्य बनले. विवाह अगदी लहानपणीं झाल्यामुळें या वेळीं त्यांना अेक कन्या होती. या दे. भ. नी संयमाचे पायीं आपल्या पत्नीस परस्त्रीसमान समजण्याचें बंधन आपणावर लादून घेतलें. पण याला आपल्या पत्नीची अनुमति बहुधा घेतली नसेल, यामुळें तिच्या मनावर व शरीरावर विपरीत परिणाम होऊन मनः-स्वास्थ्य नष्ट झाले. तिचें जीवन तिला फोल वाटूं लागले. तिचा मासिकस्राव अल्पवयांतच नष्ट झाला. आतां ती क्षयी माणसासारखी दिसते. अशी स्थिति होओीपर्यंत दुराग्रहाने वागणारे हे गृहस्थ, हे खरे अहिंसक, की खुनी, हिंसक ?

---

# पत्रव्यवहार

[ सर्वच प्रश्नांची उत्तरें या सदरांत देतां येणार नाहीत. ज्यांना खाजगी उत्तरें पाहिजे असतील, त्यांनी वीस रुपये आगाऊ पाठवावे. **सं.** ]

माझ्या अेका मित्राची हकीकत खालीलप्रमाणें आहे. आशा की आपण ती लक्षांत घेऊन त्याचीं कारणें व प्रतिबंधक उपाय सुचवण्याची कृपा करावी. माझ्या मित्राचें वय सध्यां अठरा वर्षांचें असून तीन वर्षांपूर्वी बारा वर्षांच्या अेका मुलीशीं तो विवाहबद्ध झाला. नंतर त्याच्या बायकोस ऋतु-प्राप्ति झाली, पण त्याला मात्र खालील कारणांनुसार अजून तारुण्य प्राप्त झालें नसल्याचें दिसतें. १. तारुण्यांत जेथें केस आले पाहिजेत, तेथें ते आलेले नाहीत. २. तो दिसायला फार नाजूक असून वरील भागांवरच नव्हे तर अितर भागांवरही केस क्वचितच दिसतात. ३. मिशा नाहीत व अेकंदरींत चेहरा, शरीर, वगैरे साफ गुटगुटीत आहेत. त्याच्या वडिलांनी देखील कदाचित् वरील कारणांस्तव अजून शांति केली नसेल. त्याला पाह-

तांच कोणालाही वाटेल की तो बायकांची कामशांति करायला अगदीं असमर्थ आहे. तरी वरील हकीकत वरील वयाच्या मुलांत असणें शक्य आहे का?

आपला......

उ. आपणच वर्णन देतां व तें शक्य आहे का असें विचारतां, तेव्हां आपल्या वर्णनावर आपलाच विश्वास नाही की काय? वर्णन खरें धरून चालल्यास त्याच्यांत कांहीतरी कमतरता असावी असें वाटेल, परंतु केस कमी असले म्हणजे मनुष्य नपुंसकच असतो असें नाही. प्रत्यक्ष अनुभवाशिवाय तें समजणार नाही. तसें ठरल्यास तज्ञाचा सल्ला घ्यावा. सं.

---

# शारदेचें पत्र

गेल्या नवरात्रांत येथल्या तत्वज्ञानमंडळाने आपला वार्षिक समारंभ आणि वेदोत्सव साजरा केला, आणि त्य निमित्ताने ३ आक्टोबरला प्रो. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखाला अीश्वर-निरीश्वर-वादावर चर्चा झाली. मी ही बातमी १९ नोव्हेंबरच्या केसरींत वाचली, तेव्हां केसरीला या चर्चेचें महत्व किती वाटलें हें समजेल. पण मला या विषयाचें महत्व वाटतें. अेकंदर चर्चा अैकून अध्यक्षांनी समारोप करतांना निकाल दिला कीं अीश्वर मानावा लागेल. मीं चर्चा अैकली नाही, पण या निकालावरून फाटक स्वतः अीश्वर मानतात अितकेच मला समजलें. कारण खरें पाहिलें तर जे लोक वेदोत्सव करतात, ते वेद मानीत असले पाहिजेत असें समजायला हरकत नाही, पण वेदांत हा वेदांचाच अेक भाग आहे, आणि वेदांताची भूमिकाच अीश्वरवादी नाही. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' असें म्हटल्यावर अीश्वराला जागाच कोठे राहिली? आणि वेदांती अीश्वर मानीत नाहीत, असेंच मीं आजपर्यंत अैकत आलें. निरीश्वरवाद तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मांडला होता, तेव्हां तो मांडण्यांत कांही कसूर झाला असेल असें मला वाटत नाही. मला सहज नास्तिक या शब्दाचा अर्थ पहावासा वाटला, तेव्हां आपट्यांचा संस्कृत

कोश काढून पाहिला. त्यांत असा अर्थ दिला आहे की जो वेदांना प्रमाण मानीत नाही, किंवा जग उत्पन्न करणारा कोणी ओश्वर मानीत नाही, तो नास्तिक पण वेदांतांत तर ओश्वर मानलेला नाही. म्हणजे वेद मानले तरी मनुष्य नास्तिकच होतो, आणि न मानले तरी नास्तिक होतो, अशी अजब व्याख्या आहे. कांही झालें तरी प्रो. फाटकांच्या किंवा कोणाही आणखी अेखाद्या विद्वानाच्या मतानं या प्रश्नाचा निकाल लागणें शक्य नाही. पण या चर्चेत तर्कशास्त्राचा खून करणारे बरेच तथाकथित विद्वान बोलले असें दिसतें. वास्तविक ओश्वर हा मनुष्याने बनविलेला अेक काल्पनिक प्राणी आहे, हें मला नक्की कळलेलें आहे.

आणि मला त्यांत आश्चर्य मुळीच वाटत नाही, कारण त्याचा उपयोग किती होतो तें तर पहा! मिसरचा राजा फरूक याला आपली राणी नकोशी झाली, तेव्हां त्यानें जो जाहिरनामा काढला, त्यांत ओश्वराला खेंचून आणला होता. त्यांत असें म्हटलें होतें की मी या राणीला सोडचिठ्ठी द्यावी आणि तिने ती कबूल करावी, अशी प्रेरणा आम्हाला ओश्वरानें दिली आहे. तेव्हां यांत अन्याय असणें शक्यच नाही. गांधींनाच आंतला आवाज होता असें नाही, कोणालाही त्याचा उपयोग करतां येतो. ओश्वर आहेच तसा! आणि म्हणूनच त्याला बनवला आहे.

हे घटनासमितीवाले अितके विद्वान असतील अशी माझी कल्पना नव्हती. त्यांनी म्हणे घटनेंत असें अेक कलम घातलें आहे की हिंदुस्थानांत मिठावर कर असणार नाही. घटनेंत काय गोष्टींचा समावेश व्हावा हें देखील यांना कळूं नये? ही काय घटनेंत घालण्यासारखी गोष्ट आहे? गांधींना अिंग्रजांविरुद्ध ओरड करण्याकरतां कांहींतरी सबब पाहिजे होती, म्हणून त्यांनी मिठावरच्या कराबद्दल बोंबाबोंब केली, आणि स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर मिठावरचा कर काढला, पण त्याचा परिणाम काय झाला, तर मिठाची किंमत वाढली. हा काय गरिबांवर उपकार झाला? जो कर

काढल्याने गरिबांचे हाल होतात, तो वाईट कसा ठरतो ?

या संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नामुळें बऱ्याच बड्याबड्या गुजराथ्यांना वेड लागलें आहे असें वाटतें. एका काळीं न्यायमूर्ति असलेले दिवाटिआ यांनीही ठाणें जिल्हा गुजराथला जोडावा असें मत द्यावें, हा वेड लागल्याचा पुरावाच नव्हे का ? हे गुजराथी एकदम इतके बेअकली कसे झाले ? त्यांना महाराष्ट्रांतून काढून टाका, किंवा त्यांना येथें व्यापार-करूं देऊं नका, असें म्हणणारा एक देखील महाराष्ट्रीय सांपडणार नाहीं. मग त्यांतले बडे व्यापारी आपल्या अकलेचें जें प्रदर्शन करीत आहेत, तें कां ? मुंबई महाराष्ट्रांत आहे की नाही, हा भूगोलाचा प्रश्न आहे. गुजराती कितीहि बेअकली असले, आणि ते भूगोल शिकले नसले, तरी एवढी माहिती सहज मिळण्यासारखी आहे, एवढें सुद्धां त्यांना कळूं नये ! हीं वेडाचा चिन्हें आहेत.

सरकारला कांही वेड लागलें आहे असें म्हणतां येत नाहीं, कारण त्यांत धोका आहे. परवां कोणातरी शिक्षकाने भगव्या झेंड्याचा जयजयकार केल्याबद्दल त्याला काढून टाकला असें ऐकलें, तेव्हां या सरकारला भ्यालें पाहिजे. पण त्यांनी चलचित्रांच्या निर्मात्यांना जे दंडक घालून दिले आहेत, त्यांवरून वेडाची शंका खरोखरच येते. त्यांतला एक इशारा असा की दारू पिण्याचीं दृश्यें दाखवतां नये इतकेंच नव्हे, तर दारूचें अस्तित्व ज्यांवरून समजेल असेंही कांही दाखवतां नये. सरकारच्या दारूबंदीच्या प्रचारावरूनच दारूचें अस्तित्व समजत नाही का ? मग हा आचरटपणा कशाकरतां ? शिवाय त्याला एक अपवाद केला आहे, की दारूचे वाईट परिणाम दाखवले असतील, तर दारूचें दृश्य चालेल, पण त्यावरून दारूचें अस्तित्व कळत नाही का ? तें कोणत्याही दृश्याने कळलें तरी त्यांत फरक काय झाला ? याला वेड म्हणावें नाहीतर काय करावें ? हे एकंदर नियम इतके अचरट आहेत की आतां बोलपट दाखवण्याऐवजीं निर्मात्यांनी आपल्या खर्चाने मुरारजी देसायांसारख्या सात्विक गृहस्थांचीं व्याख्यानें करावीं, असाच कां

नाहीं नियम कला? प्रेक्षक येणार नाहींत हा भाग वेगळा, पण नीतीचें तर संरक्षण होईल!

यंदाच्या दिवाळी अंकांत एकाने खाडिलकर आणि गडकरी यांना नाट्यसृष्टींतील सूर्य आणि चंद्र बनवले आहेत, आणि हा फरक कां? तर म्हणे खाडिलकर स्वयंप्रकाशित होते, आणि गडकऱ्यांनी उसनवारी केली होती म्हणून. दुसऱ्यांनी लिहिलेल्या गोष्टी घेऊन त्यांच्या आधाराने नाटकांचीं कथानकें रचायचीं, ही नाटककारांची रीतच आहे. शेक्सपिअरने तेंच केलें आहे, कालिदासाने तेंच केलें आहे. पण शेक्सपिअरनें एक गोष्ट चांगली केली आहे की त्याने अगोदरच सुप्रसिद्ध झालेलीं पात्रें न निवडतां अप्रसिद्ध लेखकांच्या गोष्टी आधाराला घेतल्या आहेत, आणि त्या कोठून घेतल्या हा शोध टीकाकारांनी लावला आहे. हें मी चांगलें अशाकरतां म्हणतें की जीं पात्रें अगोदरच लोकांच्या परिचयाचीं झालेलीं असतात, तींच नाटककाराने विकृत स्वरूपांत दाखवणें हा एक प्रकारचा अत्याचार आहे. खाडिलकरांनी देखील उसनवारी केलीच आहे आणि मी म्हणतें असे अत्याचारही केले आहेत. गडकऱ्यांनी हरिभाऊ आपट्यांची एक गोष्ट एकच प्यालाकरतां उसनी घेऊन त्यांत फक्त एखादं गौण पात्र नवीन घातलें आहे, म्हणून त्यांना परप्रकाशित पाहिजे तर म्हणावें, पण त्यांनी मी म्हणतें असा अत्याचार केला नाहीं. बाकी एकच प्याला हें नाटक अत्यंत गचाळ आहे आणि त्याच्या जोरावर दुसऱ्या अेका लेखकाने गडकऱ्यांना मराठी नाटककारांत अग्रगण्य ठरवलें आहे, हा अधिकच आचरटपणा आहे. माझ्या मतें गडकऱ्यांचा अनुक्रम बराच खालीं लागेल. किर्लोस्कर आणि देवल या दोन नाटककारांची जागा हिरावून घेअील असा नाटककार अजून जन्माला आला नाहीं.

पण मी म्हणत होतें तें राहिलेंच. महाभारतांतलें दुष्यंताचें पात्र घेऊन त्याचा मुळांतला दुष्टपणा काढून टाकून त्याला मोठा सात्विक बनवणें

हा कालिदासानें अत्याचारच केला आहे, आणि तो मला पसंत नाही. आतां कालिदासाचें नाटक महाभारतापेक्षां अतिकेंच प्रसिद्धि पावल्यामुळें माझें म्हणणें कोणी कदाचित् कबूल करणार नाही, पण तो अत्याचारच आहे. खाडिलकरांनी देखील शुक्राचार्यांसारखीं पात्रें घेऊन त्यांच्यावर अत्याचार केला आहे. दारू पिणारा अेक पंथ काढल्याचा त्यांच्यावर आरोप करून काय साधलें ? आजपर्यंत दारूविरुद्ध प्रचाराकरतां म्हणून जेवढीं नाटकें लिहिलेलीं आहेत, त्यांपैकी अेकाचाही उद्देश सिद्धीस गेला नाही. कोणी या दृष्टीने खाडिलकरांचें नाटक चांगलें म्हणतो, कोणी गडकऱ्यांचें म्हणतो, पण दोन्हीही या दृष्टीने गचाळच आहेत आणि या बाबतींत नाटककादंबऱ्यांचा प्रचार यशस्वी होणेंही शक्य नाही. लोक दारू कां पितात, याचा विचार केल्याशिवाय प्रचाराचा उपयोग कसा होणार ? जे लोक मासे पकडण्याकरतां सारा दिवस पाण्यांत घालवतात, त्यांच्या अंगांत दारू प्याल्याशिवाय उष्णताच येत नाही असें ते म्हणतात, तें खोटें म्हणतां येत नाही. तेथें कादंबऱ्या काय करतील ?

मुरारजी देसायांनी नुकतेंच अेका व्याख्यानांत अेक विधान ठोकून दिलें की जोंपर्यंत दारूबंदी केली नाही, तोंपर्यंत कोणत्याही उपायांनी हिंदुस्थानचें दारिद्र्य नष्ट होणार नाही, कारण कोणाला कितीही पैसे मिळाले तरी तो ते दारूपायीं घालवून बसणार ! बोलण्यापूर्वी थोडातरी विचार करावा, हें या कांग्रेसवाल्यांच्या डोक्यांत येत नाही, परंतु अशा तऱ्हेने बोलणारावर लोकांचा विश्वास कसा बसावा ? हल्लीं जगांत सर्वांत श्रीमंत राष्ट्र अमेरिका आहे आणि तेथें पूर्वी चालू केलेली दारूबंदी आतां काढून टाकली असतांही अमेरिका अजून दरिद्री झालेली नाही, किंवा दारूबंदीच्या काळांत अमेरिकेची अधिक भरभराट होती असेंही कोणाला म्हणतां येणार नाही. मग तोंडाला येईल तें ठोकून देण्यांत काय अर्थ आहे ? अशा प्रचाराला काडीची किंमत नाही.

तुझी शारदा.

---

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. नें सवातीन. कोणत्याही महिन्यापासून सुरू करतां येतें.

## आमचेकडे मिळणारा माल

**लॅम्बर्ट डच कॅप**, रु. ५. **उभट टोपी**, रु. १॥. **राइट कॉन्ट्रॅसेप्टिव्ह जली**, रु. ३॥. **पिशव्या** ४ आणे, ८ आणे, रु. १, रु.१॥. **जेलोट्यूब** (फ्रेंच रोग प्रतिबंधक) २ नळ्यांचे पेटीस रु. २. **राइटट्यूब** (आम्ही बनवलेलें), नळीस १४ आणे.

**ल्यूटीज फार्माकल कं.** चीं होमिओपथिक व इतर औषधें ( अमेरिकन ):—

**क्रमांक १४** (संधिवात, सायॅटिका, कटिवात, वगैरे ) रु. २–१२.

,, ६६ ( सौम्य सारक औषध ) रु. १.

,, १०५ ( अपचन, वायु धरणें, पोटदुखी ) रु. १-८.

,, १७७ (मुरुमाचे व इतर फोड, गळवें, एक्झेमा, वगैरे) रु. १-८.

,, १८३ (पडसें, इन्फ्लुएन्झा, ताप, डोकेंदुखी) रु. १-१४.

,, २५९ (फाजील रक्तदाब) रु. २–१२.

**ग्लँडेक्स** ( स्त्री–पुरुषांच्या बीजकोशांचें कार्य बरोबर न झाल्यानें होणारे रोग, अकाली वार्धक्य, रक्तदाबाची कमतरता नपुंसकत्व, मंदकामता, वगैरे ) पुरुषांकरितां, रु. ९–८.

**सॅग्वीना एलिक्सर** ( रक्तक्षय, अशक्तता, कृशता ) रु. ३–४.

**राइट एजन्सी**, १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

Registered No. **B 2289**.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत पुस्तकें

१. **आधुनिक आहारशास्त्र,** किं. १॥ रु , ट. ख, ६ आणे.

२. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], चौथी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ७ आणे.

३. **संततिनियमन** [सचित्र], ९ वी आ. १। रु ट. ख. २ आ.

४. **गुप्त रोगांपासून बचाव,** ४ थी आ. रु १, ट. ख. ५ आणे.

५. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४-५-६], किं. २-०-०, ट. ख. ६ आ.

६. **त्वचेची निगा,** किं. ८ आ., ट. ख. ५ आ.

७. **गुरुबाजी** (नाटक) किं. ८ आ., ट. ख. ५ आणे

८. **वेश्याव्यवसाय,** किं. २ रु., ट. ख. ६ आ.

९. **तेरा गोष्टी,** किं. १ रु. ट. ख. ५ आ.

१०. **न्यायाचा शोध** ( नवीन सामाजिक नाटक )
किंमत १ रु., ट. ख. ५

११. **पॅरिसच्या परी,** किं. ३ रु., ट. ख. ६ आणे.

## डॉ. के. भा. लेलेकृत

१. **बाहेरख्यालीचे दुष्परिणाम,** २ री आ., किं. ५ आ.

२. **मूळव्याध.** किं. ४ आ.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई-७

मुद्रक व प्रकाशकः—**रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,**
नं. १३, भटवाडी कॉस लेन, गिरगांव, मुंबई-४